# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 21 October 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.**

****

जागतिक भवितव्याला आकार देण्यात भारत पुढाकार घेत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. एका खाजगी वृत्तवाहिनीनं आयोजित केलेल्या जागतिक शिखर परिषदेला पंतप्रधानांनी आज संबोधित केलं. जग एआयला कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणून ओळखत असताना, आपल्या देशासाठी एआय म्हणजे आकांक्षी भारत असल्याचं मोदी म्हणाले. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या पहिल्या १२५ दिवसांत नऊ लाख कोटी रुपयांचे पायाभूत सुविधांविषयीचे प्रकल्प मंजूर करण्यात आल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. तसंच १५ नव्या वंदे भारत रेल्वेंची सुरुवात, आठ विमानतळांचे बांधकाम, पाच लाख घरांवर सौरछत आणि ९० लाखांहून अधिक वृक्षारोपण करण्यात आल्याची माहिती पंतप्रधान मोदी यांनी दिली.

****

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय स्तरावरील संघटनात्मक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आज नवी दिल्लीत अध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक होत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नियोजन आणि प्रशिक्षण यासंदर्भात या बैठकीत विचारविनिमय होईल. सर्व प्रदेशाध्यक्ष, संघटना महामंत्री आणि राजकीय पदाधिकारी या बैठकीत सहभागी होणार आहेत. यामध्ये राष्ट्रीय अध्यक्षांची निवड करण्यात येणार आहे. विद्यमान अध्यक्ष जे.पी.नड्डा यांचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे. राष्ट्रीय कार्यकारिणीच्या निर्णयानुसार नड्डा यांनी संघटनात्मक निवडणुकांसाठी निवडणूक अधिकारी सहअधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

****

महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांसंदर्भात आज काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची नवी दिल्लीत बैठक होणार आहे. दोन्ही राज्यांच्या उमेदवारांच्या निवडीबाबत या बैठकीत विचारमंथन होणार आहे. मात्र दोन्ही राज्यातल्या निवडणुकांसाठी काँगेसनं अद्याप एकाही उमेदवाराचं नाव जाहीर केलेलं नाही. महाराष्ट्रातल्या निवडणुकीसाठी काँग्रेसच्या एका समितीनं केंद्रीय निवडणूक समितीच्या विचारार्थ ६२ उमेदवारांच्या यादीला मंजुरी दिली होती. झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी संयुक्त जनता दलानं दोन उमेदवार जाहीर केले आहेत.

****

पोलीस स्मृतिदिनानिमित्त राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी शहीद पोलीस हुतात्म्यांना नायगाव पोलीस मुख्यालयात श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी त्यांच्यासमवेत शिवसेना नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उपस्थित होते.

****

बुलडाणा जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाने तिनही विद्यमान आमदारांना विधानसभेची उमेदवारी जाहीर केली आहे. जळगाव जामोद मतदारसंघातून डॉ संजय कुटे, खामगाव मधून विधीज्ञ आकाश फुंडकर आणि चिखलीमधून श्वेता महाले निवडणूक लढवणार आहेत.

****

पुण्यातल्या मंडई मेट्रो स्थानकात तळमजल्यावर फोमच्या साहित्याला लागलेली आग आटोक्यात आली आहे. या आगीचा मेट्रो सेवेवर कोणताही परिणाम झाला नसल्याची माहिती केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. मध्यरात्री या ठिकाणी आग लागल्यानंतर तातडीनं अग्निशमन दलानं ५ वाहनांच्या मदतीनं आग आटोक्यात आणल्याचं सूत्रांनी सांगितलं.

****

सामान्य नागरिकांसाठी किफायतशीर दराने विमानप्रवास उपलब्ध करुन देणाऱ्या उडाण योजनेला आज आठ वर्ष पूर्ण झाली. यानिमित्त दिल्ली इथं आयोजित कार्यक्रमाला केंद्रीय हवाई वाहतूकमंत्री राममोहन नायडू यांनी संबोधित केलं. या योजनेअंतर्गत ३४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश ६०१ हवाईमार्गांनी जोडले आहेत. तर, आतापर्यंत एक कोटी ४४ लाख प्रवाशांना या योजनेचा लाभ झाला आहे.

****

येत्या २४ तासांत पूर्व मध्य बंगालच्या उपसागरावर आणि उत्तर अंदमान समुद्रालगतच्या भागात कमी दाबाचं क्षेत्र तयार होण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तमिळनाडू, पुदुचेरी, कराईकल, केरळ आणि दक्षिण अंतर्गत कर्नाटकात पुढील तीन दिवसांत मुसळधार पावसाचा अंदाज आहे. तसंच उद्या कर्नाटक आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पूर्व–मध्य बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ बुधवारपर्यंत तयार होईल आणि गुरुवारी ओडिशा आणि पश्चिम बंगाल किनारपट्टीवर ताशी १०० ते १२० किलोमीटर वेगाने वाऱ्यासह धडकेल असंही विभागातर्फे सांगण्यात आलं आहे.

****

सोने आणि चांदीच्या दरानं उच्चांक गाठला आहे. आज २४ कॅरेट सोन्याचा १० ग्रॅमसाठीचा दर ७८ हजार ४०० रुपये आहे, तर एक किलो चांदीचा दर ९८ हजार १९० रुपये आहे. आज, देशांतर्गत शेअर बाजारात चांगली खरेदी दिसून येत असून सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही निर्देशांकांत वाढ नोंदवली. सुरुवातीला निफ्टीने वाढीसह २४,९५० चा टप्पा पार केला तर सेन्सेक्समध्ये ४०० हून अधिक अंकांची वाढ दिसून आली.

****

भारताच्या दीपिका कुमारीने मेक्सिकोमध्ये झालेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत महिलांच्या रिकर्व्ह प्रकारात रौप्य पदक पटकावलं आहे. दीपिकाला अंतिम फेरीत चीनच्या ली झियामनकडून पराभव पत्करावा लागला. तिरंदाजी विश्वचषकात दीपिकाकुमारीनं पाचव्यांदा उपविजेतेपद पटकावलं आहे.

****

काश्मीर खोऱ्यात श्रीनगरमध्ये काल पहिल्या आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं होतं. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी पोलो मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवला. ४२ किलोमीटर पूर्ण मॅरेथॉन आणि २१ किलोमीटर अर्ध मॅरेथॉनमध्ये देशभरातील सताराशेहून अधिक धावपटू आणि १२ परदेशातील खेळाडूंनी भाग घेतला.

****